सकाळ

# जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय साखर संकुल शिवाजीनगर पुणे-४११००५

जा.क्र. विसनिपुणे/निवडणूक/पुणे जिमस बँका/१२२४/२०२६ दिनांक: २१/०८/२०२६

**पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., पुणे संचालक मंडळ निवडणूक सन २०२६-२७ ते २०३१-३२.**
**- संस्था सभासदांचे ठराव मागविण्याचा कार्यक्रम**
**(फक्त बँकेच्या सभासद संस्थाकरीता)**

## जाहीर सूचना

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., पुणे या बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेच्या संचालक मंडळ निवडणूक सन २०२६-२७ ते २०३१-३२ करीता सभासद संस्थांच्या प्रतिनिधींचे ठराव महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ व सुधारीत नियम २०१७ असाधारण राजपत्र दिनांक ०६/०८/२०१९ मधील नियम क्रमांक ९ आणि १० अन्वये दिनांक २४/०८/२०२६ ते दिनांक २२/०९/२०२६ या कालावधीत मागविण्यात येत आहे. सभासद संस्थांची प्राथमिक मतदार यादी ही दिनांक ०३/०१/२०२७ या अर्हता दिनांकावर निश्चित करावयाची आहे. तरी सभासद संस्थांनी प्रतिनिधीचे ठराव पाठविताना खालील प्रमाणे सूचना विचारात घ्याव्यात.

| तपशील | तारीख/कालावधी |
|---|---|
| निवडणूक नियम १० (३) अन्वये सभासद संस्थेचे ठराव मागविण्याचा दिनांक (संबंधित तालुका उप/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयाकडे कार्यालयीन वेळेत चार प्रतींमध्ये दाखल करणे) | दि. २४/०८/२०२६ ते दि. २२/०९/२०२६ |

१. प्रतिनिधी ठरावा संबंधीचा नमुना सर्व सभासद सहकारी संस्थांना टपालाव्दारे (Speed Post) स्वतंत्ररित्या पाठविण्यात आलेला आहे. सदर पत्र टपालाव्दारे प्राप्त न झाल्यास याबाबत संबंधित तालुका उप / सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयाशी संपर्क साधून प्राप्त करुन घ्यावे.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ मधील नियम ९, १० व ११ यानुसार मतदार यादी तयार करावयाची आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २६ व २७ आणि बँकेच्या मंजूर उपविधीतील तरतुदीन्वये सभासदाने पात्रता धारणा केलेली असावी.

३. संस्थांनी ठराव सादर करताना सहकार कायद्यातील कलम २७ (१०) व संलग्न कलम ७३ (सीए) (१) (फ) (i), (ii) व (iii) अन्वयेच्या तरतुदी विचारात घेऊन सादर करावेत. सदर ठराव संस्थेच्या उपविधीतील तरतुदींनुसार उदा. संचालक मंडळाने किंवा सर्वसाधारण सभेत पारित केलेला असावा. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या सदस्य असलेल्या प्राथमिक कृषी पतसंस्था जर थकीत असतील तर अशा संस्थेच्या संचालकांच्याऐवजी सदर संस्थेच्या थकबाकीदार नसलेल्या एखाद्या सदस्याचा प्रतिनिधी म्हणून समावेश करण्याचा ठराव करावा किंवा जर सदरची संस्था थकबाकीदार नसेल तर सदर संस्थेच्या संचालक मंडळ सदस्याचा किंवा एखाद्या सभासदाचा प्रतिनिधी म्हणून ठराव करता येईल. इतर संस्थांचे बाबतीत कलम ७३ (सीए) (१) (फ) (i) आणि कलम ७३ (सीए) (१) (फ) (iii) अन्वये थकबाकीदार नसावी. नियम १० (३) अन्वये करावयाच्या ठरावाचा नमुना जिल्हा उपनिबंधक कार्यालय, तालुका उप/सहाय्यक निबंधक कार्यालय आणि बँकेकडे उपलब्ध आहे.

४. संस्थेने एकदा ठराव सादर केल्यानंतर नामनिर्देशन सादर करण्याच्या अखेरच्या तारखेच्या अगोदर पाच दिवस फक्त चार परिस्थितीतच निवडणूक नियम १० (४) नुसार त्यामध्ये बदल करता येईल. अन्यथा कोणत्याही कारणास्तव त्यामध्ये बदल करता येत नाही. एकदा ठराव पाठविलेल्या प्रतिनिधीचा मृत्यू झाल्यास किंवा प्रतिनिधीने राजीनामा दिला असेल किंवा सक्षम प्राधिकरणाच्या आदेशाने असा प्रतिनिधी अपात्र झाल्याचे आढळून आल्यास किंवा संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक होऊन नवीन संचालक मंडळ गठित झाल्यासच ठरावात बदल करून नवीन प्रतिनिधीचे नाव सदर कलमामध्ये नमूद केलेल्या विहीत मुदतीमध्येच सुचविता येईल.

५. ज्या संस्थांचे अवैधरीत्या दुबार ठराव प्राप्त होतील अशा संस्थांच्या जबाबदार व्यक्ती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १४६ नुसार फौजदारी कारवाईस पात्र राहतील, याची नोंद घ्यावी.

६. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ सीए (१) (फ) (iii) मधील तरतुदीनुसार ज्या संस्थेची व्यवस्थापन समिती निष्प्रभावित झालेली असेल अशा संस्थेचे प्रतिनिधित्व करेल अशी व्यक्ती संघीय संस्थेच्या निवडणुकीकरिता संचालक म्हणून अपात्रता धारण करीत असल्याची तरतूद आहे. सहकार अधिनियमाचे कलम ७७ (अ) व कलम ७८ अन्वये नियुक्त केलेल्या प्रशासकास अधिनियमातील तरतुदींना अधिन राहून "प्रतिनिधीची निवड करणे" या विषयासाठी सर्वसाधारण सभा बोलाविण्याचा अधिकार आहे आणि असा प्रतिनिधी जर इतर अनुषंगिक नियमांन्वये पात्र असेल तर सदर बँकेच्या मतदानास पात्र असेल.

सही/-
(दिग्विजय आहेर)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे

ठिकाण - पुणे
दिनांक - २१/०८/२०२६